# 'शुद्ध' राजकारणाचं मोजमाप

कष्टकरी जनतेला पाठोपाठ संघर्ष करणं भाग पडल्यामुळे घडलेल्या संरचनात्मक राजकारणाचा जोर आता बऱ्याच प्रमाणात ओसरला आहे, किंबहुना त्याची जागा जवळपास पूर्णपणे निवडणुकीय राजकारणाने घेतली आहे.

निवडणुकीच्या राजकारणानेही नवीन वळण घेतलं आहे- असुरक्षित घटकांच्या नेत्यांसोबतच सर्व जण सत्ताधारी वर्गाचा भाग बनू पाहात आहेत. आदर्शाच्या संकल्पनेसोबत उभं ठाकण्याऐवजी शक्यतेच्या अवकाशामध्ये जाण्याला प्राधान्य मिळतं आहे.

तर, राजकीय प्रवृत्ती दाखवणाऱ्या वास्तववादामध्ये 'शक्यतेच्या राजकारणा'ची भाषा बोलली जाते. या वळणाची दखल घेत अशा राजकारणाची चिकित्सा करणं आपल्याला भाग आहे. शिवाय, यातूनच राजकारणाच्या पर्यायी संकल्पनात्मक मांडणीसाठीही आपण उद्युक्त होऊ शकतो. किमान नैतिक निकषांच्या आधारे जीवनातील परिस्थितीचं आकलन करून घेऊन या राजकारणाचा अर्थबोध मांडायला हवा. असा निकष सार्वत्रिकरित्या वैध ठरणारा असतो, त्यात व्यक्तीचा विचारी जीव म्हणून आदर केला जातो, आणि व्यक्तीला जिवंत राहाण्यासाठी आवश्यक परिस्थिती व प्रतिष्ठित जगणं लाभेल याची खातरजमा केली जाते. इथे एक मूलभूत प्रश्न उपस्थित करायला हवा : निवडणुकीच्या राजकारणाने घेतलेलं वास्तववादी वळण समाजाची किमान नैतिक जीवनाची गरज पूर्ण करतं का?

वास्तववादी घटकाला अर्थ देणाऱ्या मर्यादा उघड करून किमान नैतिकता साध्य करण्यामध्ये हा घटक कसा अपुरा ठरतो, हे आपण मांडायला हवं. शुद्ध वा आदर्श राजकारणाच्या पर्यायी मांडणीतून वास्तववादी राजकारणाला निर्णायकरित्या वगळण्यात आलं, तरच या राजकारणाच्या चिकित्सेला जोर मिळेल. निराळ्या शब्दांत सांगायचं तर, नैतिक व बौद्धिक अढळपणा प्राप्त झालेल्या प्रक्रियेतून राजकारणाची शुद्ध वा आदर्श पर्यायी संकल्पना उभी राहते, आणि समीकरणं मांडून सोयीस्कर वापर करून व्यूहरचना आखणाऱ्या राजकारणावर मात करण्याचा या पर्यायी संकल्पनेचा प्रयत्न असतो. तर, शुद्ध राजकारणाची संकल्पना राजकारणाच्या वास्तववादी स्वरूपांची चिकित्सा करते.

एका बाजूला सामाजिक, सांस्कृतिक व भौतिक मालमत्ता निर्माण करून त्यांच्यात वाढ करणं आणि दुसऱ्या बाजूला दायित्व पूर्णतः टाळणं वा स्वीकारणं, या बाबी व्यूहरचनाकेंद्री राजकारणात सर्वांत महत्त्वाच्या असतात. आश्रयदातृत्वाचं वाटप करण्यामध्ये प्रभुत्वशाली स्थानी असलेल्या सत्ताधारी पक्षाला काही बाबतीत 'उदार' राहाता येतं- प्रत्यक्ष निवडणुकीच्या समीकरणात दायित्व ठरणारे, परंतु सक्षम सत्ताधारी पक्ष अशी समावेशक प्रतिमा निर्माण करण्यासाठी सामाजिकदृष्ट्या आवश्यक असलेल्या नेत्यांना सामावून घेणं, या पक्षाला परवडतं. निराळ्या शब्दांत सांगायचं तर, अशा सत्ताकांक्षी लोकांना गरिबांचे पक्ष कायमस्वरूपी दायित्व वाटतात.

आदर्श स्थितीत अशा पक्षांमध्ये प्रवेश करण्यासाठी मुक्तिदायी उद्देशाबाबत ठाम निर्धार असायला हवा. भीमराव रामजी आंबेडकर यांच्या स्वतंत्र मजूर पक्षामध्ये १९३६ साली प्रवेश करणाऱ्या प्रमुख दलितेतर नेत्यांमध्ये हा निर्धार दिसत होता. आजच्या दलित पक्षांचा गाभा भारतीय मजूर पक्षाच्या गाभ्याशी जुळणारा आहे का, हा वैध प्रश्न इथे उपस्थित करताच येईल.

शक्तिशाली सत्ताधारी पक्षांना अशा स्थलांतरामध्ये काही ना काही सकारात्मक सापडतं. इतर पक्षांकडून दुर्लक्ष झाल्याचा दावा करणाऱ्यांना आपल्या संधी रचनांमध्ये सामावून घेण्यापुरतं हे स्थलांतर सत्ताधारी पक्षांना सकारात्मक वाटतं. आपला पक्ष समावेशक आहे, या दाव्यांना आधार मिळण्यासाठी त्यांना हे गरजेचं असतं. अशा प्रकारचा पक्ष राजकारणाच्या शुद्ध रूपामध्ये व्यवहार करतो आहे, असा निष्कर्ष काढता येईल का? अशा संदर्भांमध्ये सकारात्मक राहिल्याने शुद्ध राजकारणाला आवश्यक परिस्थिती निर्माण होते का?

काही लोक सकारात्मक राजकारणाबद्दल करत असलेले समकालीन दावे विचारात घेऊ. राखीव मतदारसंघांमध्ये भारतीय जनता पक्षाला (भाजप) मिळालेलं देदिप्यमान यश हा जातीयवादी राजकारणाचा संभाव्य 'अंत' असल्याचा अर्थ काही राजकीय निरीक्षक मांडत आहेत. अशा निरीक्षणांद्वारे निवडणुकीच्या राजकारणाला सकारात्मक बाजू दिली जाते. परंतु, न्यायाची ही सर्वांत सढळ संकल्पना ठरेल. सार्वत्रिक निकष लावून खुल्या मतदारसंघांमधून अनुसूचित जातीय (शेड्युल्ड कास्ट : एससी) व अनुसूचित जमातीय (शेड्युल्ड ट्राइब : एसटी) उमेदवारांना भाजपने निवडून आणलं असतं तर सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला आशयघनता प्राप्त झाली असती. समाजामध्ये खोलवर रुजलेल्या जातजाणीवेला पुसण्यासाठी ती कृती अस्सल ठरली असती. अल्पसंख्याक व महिलांच्या प्रतिनिधित्वासंदर्भातही ही अपेक्षा वैध ठरते.

राखीव मतदारसंघांमधून मोठ्या संख्येने एससी/एसटी उमेदवार निवडून आणल्यामुळे, किमान तुलनात्मक अर्थाने, स्व-अभिमानात वाढ होते- आपल्या मूळच्या सामाजिक गटापेक्षा आपण वरचढ असल्याची भावना त्यातून प्राप्त होते. परंतु, निवडणुकीच्या राजकारणातून या विधेयकांना स्वाभिमान प्राप्त होत असला, तरी स्वतःविषयी आदर राखण्यासाठी आणि ताठ मानेने चालण्यासाठी त्यांना याचा उपयोग होतो का, हा प्रश्न आदर्श वा शुद्ध राजकारणाच्या संदर्भात महत्त्वाचा ठरतो.

असमान स्थाननिश्चितीमुळे केवळ एससी/एसटी सदस्यांना नव्हे, तर संसदेतील इतर सदस्यांनाही विविध सार्वजनिक संस्थांमध्ये व सार्वजनिक अवकाशामध्ये स्वतःचं समान मूल्य स्वतंत्रपणे प्रतिपादित करण्यापासून परावृत्त केलं जातं. प्रभुत्वशाली नेत्यांची 'पंथीय ताकदी'चा लाभ झाल्यामुळे हे विधायक स्वतःचं मूल्य प्रतिपादित न करण्यात धन्यता मानतात. श्रेणीबद्ध पक्षरचनेमध्ये अंगभूतरित्या मान्यतेचं विषम व श्रेणीबद्ध वाटप होतं, त्यात मूलतः एका विशिष्ट नेत्याबद्दलचा सतत वाढता पूज्यभाव अंतःर्भूत असतो. शुद्ध राजकारणामध्ये प्रत्येक व्यक्तीला समान नैतिक मूल्य दिलेलं असतं, त्यातूनच परस्परांना मान्यता देण्याचं तत्त्व साकारतं, परंतु श्रेणीबद्ध रचनेत हे मूल्यच नाकारलं जातं. त्याहून महत्त्वाचं म्हणजे निवडणुकीय राजकारणातील असमान संबंधांमुळे हे प्रतिनिधी किमान नैतिकतेच्या निखळ राजकारणापासून दूर जात राहातात. ●


## परिवर्तनाचा वाटसरूसाठी लेखन पाठवताना

आपले लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी ते सुवाच्य अक्षरात लिहिलेले वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत. मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये श्रीदेव ७-०७०८ या अथवा युनिकोड फाँटमध्ये पाठवावे.

# अचल प्रारब्ध, मुक्त इच्छा

*'आवश्यक वस्तू अधिनियम' स्थगित करण्याबद्दल बोलणं सोपं आहे, पण कृती अवघड आहे.*

नीती आयोगाच्या पाचव्या नियमन मंडळाची बैठक १५ जून २०१९ रोजी पार पडली. 'आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५' आणि 'आदर्श कृषी उत्पन्न बाजार समिती अधिनियम' यांसारख्या विपणनासंदर्भातील नियमनांमध्ये सुधारणा करून भारतीय शेती क्षेत्रात रचनात्मक परिवर्तन घडवावं, असं आवाहन या मंडळाने राज्य सरकारांना केलं. देशभरातील शेतीसंकटाच्या संदर्भात या अधिनियमांमध्ये सुधारणा करणं मोकळा श्वास घ्यायला उपयोगी पडेल अशी अपेक्षा आहे. शेतीमधील घटत्या उत्पन्नाला सावरण्यासाठी याचा उपयोग होईल, असं म्हटलं जातं आहे. आवश्यक वस्तू अधिनियमामध्ये सुधारणा करण्याची संकल्पना विशेष लक्ष देण्याजोगी आहे. शेती क्षेत्रामधील अतिरिक्त उत्पादनाचं व्यवस्थापन, ही सध्याची सर्वांत गंभीर समस्या असल्याचं समोर आल्यावर ही सुधारणा करण्याचा घाट घातला जातो आहे. बाजारपेठांच्या एकीकरणासाठी (स्थानिक स्पर्धात्मक समतोलाच्या परेतो अनुकूलतेसाठीची आवश्यक अट) हा अधिनियम अडचणीचा ठरतो. तो शिथील केला तर अतिरिक्त मागणी (पुरवठा) आणि त्यातून मिळणारे किंमतीचे संकेत एका बाजारपेठेकडून दुसऱ्या बाजारपेठांपर्यंत प्रक्षेपित केले जातील. निराळ्या शब्दांत सांगायचं तर, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनासाठी योग्य किंमत मिळेल, त्याचप्रमाणे उपलब्धतेमध्ये वाढ झाल्यामुळे ग्राहकांनाही किंमतीच्या संदर्भात दिलासा मिळेल.

परंतु, या सुधारणांची मार्गक्रमणा कोणती असेल याबद्दल नीती आयोगाने वा सरकारने अधिक स्पष्ट मांडणी केलेली नाही, त्यामुळे ग्राहकांच्या मनात साशंकता दाटलेली आहे. अन्नपदार्थांच्या किंमतींवर सरकारने थेट नियंत्रण ठेवलं नाही, तर दरांमधील अतार्किक चंचलतेपासून सर्वसामान्य लोकांना मिळणारं संरक्षण संपुष्टात येईल का? आवश्यक वस्तू अधिनियम हाताशी असूनही सरकारांना दरांमधील चंचलता परिणामकारकरित्या नियंत्रित करता आलेली नाही, हे इथे ध्यानात घ्यायला हवं. पूर्वीपासूनचा अंदाज घेतला, तर सरकारने साठ्याची मर्यादा जाहीर केल्यावरच मुख्यत्वे 'आवश्यक' अन्नपदार्थांच्या किरकोळ क्षेत्रातील किंमती वाढल्याचं दिसतं. उदाहरणार्थ, २००३ साली सरकारने निर्धारित केलेला साखरेचा ठरावीक वाटा व सोडप्रक्रिया यांवरील पकड आवळल्यावर साखरेची किंमत प्रति टन २५० रुपयांनी वाढली आणि २०१४ साली जानेवारी ते जुलै या दरम्यान साठ्यावर मर्यादा घातल्यामुळे उडीद, मूग व मसूर यांच्या किरकोळ किंमतींमध्ये प्रति किलोग्राम अनुक्रमे १४ रुपये, ८ रुपये व ९ रुपये अशी वाढ झाली, तर तांदळाच्या दरात प्रति किलोग्रामी १-२ रुपयांची वाढ झाली. हा पुरावा विचारात घेतला तर आघातप्रतिबंधक साठा व व्यापार यांच्याद्वारे किंमतींचं नियमन करणं अधिक योग्य राहील असं वाटतं, पण आवश्यक वस्तू अधिनियमाबाबत कोणतीही स्थगिती अंमलात आणणं कितपत व्यवहार्य आहे यावर बरीच साशंकता आहे.

आवश्यक वस्तू अधिनियमामध्ये दुरुस्ती करणं हा सांसर्गिक मुद्दा आहे. विशेषतः ज्या पिकांची नियंत्रित किंमत निश्चित करताना राजकीय बाजूचा जास्त विचार होतो, त्यांच्याबाबतीत हा मुद्दा अधिक अवघड बनतो. सरकारने उत्पादकांना विशिष्ट हमीभावाचं आश्वासन एकदा दिलं, की उत्पादित माल साठ्यातून विकत घेण्याची तजवीज करणं आपोआपच करावं लागतं. ऊसासारख्या पिकाच्या बाबतीत साखर कारखाना उद्योगामध्ये राजकीय वर्चस्व आहे, त्यामुळे साखरेच्या

किरकोळ किंमती वाढवण्यासाठी ऊसाचं दळणवळण व विपणन यांवरचं नियंत्रण शिथील करण्याला या उद्योगाकडून विरोध होईल. त्याचबरोबर कमी मागणीमुळे कारखान्यांच्या खरेदीला मर्यादा घालणं आणि पर्यायाने उत्पादकांना नियंत्रित किंमत मोजायला नकार देणं (केंद्र सरकारचा वैधानिक हमी भाव असो वा राज्य सरकारला हमी भाव) असेही उपाय योजले जातील. आघातप्रतिबंधक साठा वाचवण्यासाठी सरकार स्वतःच्या खिश्यातून किंमत मोजेल (त्यासाठी कारखान्यांवर कर वाढवला जाईल, जो अंतिमतः ग्राहकच देतात), पण राजकीय लाभ साखर उद्योगावर अवलंबून असल्यामुळे वरील गैरव्यवहारांना आळा मात्र घातला जाणार नाही. ही उदाहरणं पाहिली तर, शेतकी सुधारणांसाठी 'सहकार्यात्मक संघराज्यवाद' प्रत्यक्षात येणं व्यवहारापेक्षा संकल्पनेच्या पातळीवरच राहाणारसं दिसतं. 'आदर्श कृषी उत्पन्न बाजार समिती अधिनियम' अंमलात आणतानाचा अनुभव आपल्याला विसरता येणार नाही– या संदर्भात करण्यात आलेल्या दुरुस्त्यांची व्याप्ती व आशय यांमध्ये राज्यस्तरावर बरेच बदल करण्यात आले आणि अंमलबजावणीही रेंगाळत गेली. त्यामुळे आवश्यक वस्तू अधिनियमामधील दुरुस्त्यांबाबत केंद्र सरकारने केलेल्या शिफारसींचं पालन राज्य सरकारं कितपत करतील किंवा करतील का, हे राजकीय गरजेनुसार ठरणार आहे.

अधिनियमात दुरुस्ती करण्यासंबंधी– विशेषतः साठा मर्यादित करण्यासंदर्भातील उद्देशाचं अधिकृत स्पष्टीकरण जास्त निराशाजनक आहे. शेतकी विपणनामध्ये आत्यंतिक गरजेच्या असलेल्या गुंतवणुकीला (विशेषतः कॉर्पोरेट गुंतवणुकीला) प्रोत्साहन देण्याचं काम या दुरुस्तीद्वारे होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. 'बाजारपेठीय स्वप्नरंजनवादा'ची काही नमुनेदार वैशिष्ट्यांवर आधारलेलं हे स्पष्टीकरण आहे. एक, शेतीच्या परिवर्तनामध्ये खाजगी क्षेत्राची भूमिका अभिनव असेल किंवा त्यातून सर्व रंगरूपच पालटून जाईल, त्यामुळे ग्रामीण विकासाच्या व्यूहरचनेमध्ये खाजगी क्षेत्राचा समावेश करायला हवा. दोन, बाजारपेठेची कार्यक्षमतेसंबंधीची निष्पत्ती आणि विपणनविषयक कार्यक्षमता सुधारण्यातील खाजगी क्षेत्राची भूमिका स्वयंसिद्ध आहे– अशी ही धारणा आहे. किमान सरकार, कमाल शासन (मिनिमम गव्हर्नमेन्ट, मॅक्झिमम गव्हर्नन्स) या नरेंद्र मोदी यांनी २०१४च्या निवडणुकांवेळी दिलेल्या आश्वासनाशी सुसंगतच युक्तिवाद या दुरुस्तीच्या निमित्ताने करण्यात आला, पण शासनासंबंधीचा/नियमनासंबंधीचा आराखडा नसेल, तर खाजगी क्षेत्राचं शेतीमध्ये एकीकरण साधणं एकंदर शेतकऱ्यांना आणि विशेषतः अल्पभूधारकांना कशा रितीने उपयोगी ठरेल याविषयी अस्पष्टता राहाते. किंबहुना, समभागधारणा, सौदेबाजीचा लाभ, जोखीम घेण्याची क्षमता, आणि माहितीवरील नियंत्रण हे बाजारपेठेतील सत्ता-वर्तनातील कळीचे घटक आहेत, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. सत्ता-वर्तनामुळे राज्यसंस्थेला 'बचावात्मक समायोजना'ची भूमिका घ्यावी लागते अशा बाजारपेठीय देवाणघेवाणीत, नियमन काढल्याने (या संदर्भात आवश्यक वस्तू अधिनियम स्थगित केल्याने) केवळ सरकारी व खाजगी क्षेत्रांमधील स्वार्थी लाभधारणेचं प्रमाण बदलण्याची तेवढी शक्यता असते. पण ही लाभधारणा कमी करण्याचं उद्दिष्ट मात्र अशा उपायांनी साधलं जात नाही. या पार्श्वभूमीवर, 'समावेशक' शेतकी सुधारणांची नवनिर्वाचित सरकारची राजकीय इच्छा कसोटीला उतरते का, ते पाहावं लागेल. या सुधारणा परिणामकारक ठरण्यासाठी येत्या दिवसांमध्ये 'सक्षम पर्यावरण' तयार करता आलं, तरच सरकारला ही कसोटी यशस्वीरित्या पार पाडता येईल.

●

# शिक्षण आणि सामायिक हिताची संकल्पना

हित व शिक्षण या गोष्टी परस्परांशी लाभदायक नात्याने जोडलेल्या असतात. हित व शिक्षण यांच्यातील हे नातं नैतिक समजुतीच्या उच्चस्तरावर प्रस्थापित होतं. नैतिक हिताला मूलतः दोन बाजू आहेत : सामायिक हित आणि व्यक्तिगत हित. सामायिक हित आदर्श असतं, तर व्यक्तिगत हित अस्तित्वलक्ष्यी असतं. सामायिक हिताच्या संकल्पनेमध्ये शांतता, सौहार्द व मानवतेविषयीचा आदर यांवर सार्वत्रिक भर दिलेला असतो. सामायिक हितामध्ये मानवी मूल्यांचा समावेश असतो आणि जात, लिंग, वंश व धर्म यांसारख्या विशिष्ट मूल्यांहून मानवी मूल्यांना वरचं स्थान दिलं जातं. ही मूल्यं राज्यघटनेसाठी अविभाज्य आहेत आणि २०१९ सालच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या मूल्यसाठ्यांमध्येही त्यांचा उल्लेख आहे. शिक्षणाद्वारे या मूल्यांना प्रोत्साहन दिलं जायला हवं, हे खरं आहे. शिक्षणप्रक्रियेमधून या मूल्यांची आदर्शलक्ष्यी निष्पत्ती साधायला हवी. सामायिक हिताला चालना देण्याच्या प्रक्रियेत प्रतिगामी मूल्यांचा हस्तक्षेप होत असतो आणि या प्रतिगामित्वाच्या कठोर चौकटीतून केवळ स्वतःलाच नव्हे तर विद्यार्थ्यांनाही बाहेर काढण्यासाठी आवश्यक आकलन क्षमता आधारभूत मानून शिक्षकांच्या गुणवत्तेचं मूल्यमापन व्हायला हवं.

प्रतिगामी मूल्यांचं आवाहन चिंतनशीलतेद्वारे नाकारून सामायिक हिताची वैश्विक संकल्पना प्रचलित करण्याची संधी शिक्षणामुळे मिळते. आकलनासाठी इतरांच्या (स्वार्थी राजकीय नेते, रुढीवादी पालक व संदिग्धतावादी विचारक) अलंकारिक सल्ल्यांवर किंवा यांत्रिक विचारसरणीय आवाहनांवर अवलंबून राहाणं कमी व्हायचं असेल तर चिंतनशीलता महत्त्वाची ठरते. आकलनक्षमता प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांकडून स्वतंत्र निवाड्याची अपेक्षा ठेवता येते. परंतु, सामायिक हितासाठी आवश्यक मूल्यं रुजवण्यासाठी कनिष्ठ पातळ्यांवर शैक्षणिक साधनांची गरज भासू शकते. सामायिक हिताचा घटक असलेल्या मानवी मूल्यांची आदर्शलक्ष्यी वाढ होण्यासाठी सामाजिक-सांस्कृतिकदृष्ट्या संमिश्र वर्गांद्वारे उत्कृष्ट अवकाश लाभतो.

परंतु, त्यासंबंधीच्या प्रसाराचा मार्ग सुरक्षित नसल्याचं दिसतं. सरकारी शाळा व उच्चशिक्षण संस्थांसमोर अनेकाने समस्या उभ्या असल्यामुळे ही असुरक्षितता भासते. या संस्थांना अर्थपूर्ण अस्तित्त्व लाभण्याची जबाबदारी असलेले घटक या संस्थांच्या पुनर्स्थापनेबद्दल फारशी फिकीर करत नाहीत, ही अधिक गंभीर समस्या आहे. कमी संसाधनं असलेले किंवा अजिबात संसाधनं नसलेले पालकही खाजगी शाळांच्या व कोचिंग क्लासच्या व्यवस्थांकडे वाढत्या संख्येने वळत आहेत, यातून सदर समस्येचा दाखला मिळतो. या पालकांना दोष देण्यात अर्थ नाही. दर्जेदार शिक्षक नियमितपणे आपल्या मुलांना उपलब्ध करून द्यावेत, त्याचप्रमाणे 'दर्जेदार मध्यान्ह आहार' उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी पालकांचा एक गट, विशेषतः वंचित समुदायातील पालक स्थानिक पातळीवरील सरकारी पदाधिकाऱ्यांकडे करत असतात. या संदर्भात काही प्रश्न विचारणं भाग आहे : सामायिक हिताला चालना देण्याचा प्रश्न खाजगी संस्था कशा रितीने हाताळतात? या प्रक्रियेशी संबंधित असलेल्यांनी केवळ कौशल्य, ज्ञान यांच्या वाढीमध्ये आणि वंचित सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या मुलांना खाजगी संस्थांत सामील करून घेण्यामध्ये समाधान मानता कामा नये. तसे झाल्याने 'राष्ट्रीय शिक्षण धोरण, २०१९'मध्ये मांडलेल्या स्थितीत्मक समतेच्या संकल्पनेमुळे विद्यार्थी व शिक्षक यांच्यात मूल्यांची आदर्शलक्ष्यी वाढ कशी होणार आहे?

उभ्या व आडव्या स्तरांवर खोलवर विखंडित झालेल्या सामाजिक संबंधांमध्ये अस्तित्त्वात असलेलं सामाजिक अंतर संपवण्याची गरज आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या मसुद्यात म्हटल्याप्रमाणे मुलांना चांगल्या उद्देशाने आणि प्रेरणेने उच्चभ्रू शाळांमध्ये किंवा खाजगी विद्यापीठांमध्ये व महाविद्यालयांमध्ये दाखल केलं, तर रचनात्मक समस्यांना तितक्याच अविचाराने सामोरं गेल्यासारखं होईल. जात व लिंग यांच्यासंबंधीतलं सामाजिक अंतर आधीच संपुष्टात आलं आहे, असं धोरणकर्ते गृहित धरतात, त्यामुळे हे घडतं. सखोल रुजलेला तणाव दूर केला नाही, तर राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या मसुद्यात प्रस्तावित केलेलं रचनात्मक एकीकरण वरवरचंच ठरेल. वंचित सामाजिक गटांमधील मुलांना शैक्षणिक व्यवस्थेत सम्मीलीत करून घेणं, असा सामायिक हिताचा अर्थ नाही, तर रचनात्मक विषमतांचं उच्चाटन करणं म्हणजे सामायिक हित साधणं.

शाळांमधून वंचित मुलांची मोठ्या प्रमाणात गळती होते, आणि उरलेल्यातील खूपच कमी मुले महाविद्यालयापर्यंत जातात, यामागचे कारण रचनात्मक विषमतेमध्येच रुजलेलं आहे. धोरण मसुद्यात नमूद केलेला पायाभूत सुविधांचा विस्तार आणि त्याद्वारे शैक्षणिक उपलब्धतेत वाढ करण्याचे प्रयत्न, हे सर्व महत्त्वाचं आहे, पण याच धोरणात मांडलेलं चांगल्या समाजाचं चित्र प्रत्यक्षात येण्यासाठी कळीची ठरणारी सामाजिक दृष्टी विस्तारणं खूप जास्त महत्त्वाचं आहे. या मसुद्यामध्ये नीतिमूल्यांचाही उल्लेख आहे. शिक्षणव्यवस्थेचे घटक असलेल्यांना सदर मूल्यांच्या दिशेने नेण्यासाठी हे गरजंचं आहे. परंतु, व्यक्तिगत हितासाठी घेतलं जाणारं शिक्षण आणि जिवंत वास्तवामध्ये ही मूल्यं रुजवण्यासाठी गरजेची व्यावहारिक नैतिक कटिबद्धता यांच्यात सतत तणाव राहात असल्याने असा समाज प्रत्यक्षात येणं अवघड बनतं. स्वतःशी असलेली व्यावहारिक नाती आणि इतरांशी असलेली नैतिक नाती, यांच्यातील तफावत कशी भरून काढायची, या प्रश्नाची मांडणी धोरण मसुद्यात केली जाणं अत्यावश्यक आहे. ●

---

## खेळ आविर्भावाचा

*हिंदीला प्रोत्साहन देण्याचा निर्णय हा आशयघनतेपेक्षा पवित्रा घेण्याशी निगडित आहे.*

जून महिन्यात दिल्लीमध्ये क्षणिक धुळीची वादळं येतात. या वेळी आलेल्या वादळाने अर्धशतकापूर्वी खाली बसलेली धूळ पुन्हा वर उडवली आहे. दीर्घ काळ चाललेल्या संसदीय निवडणुका समाप्त झाल्यावर निवडणुकीच्या निष्पत्तीचं आकलन करून घ्यायला देशाला अजून पुरेसा वेळही मिळालेला नाही. इतक्यात, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मसुद्यामध्ये जुन्या त्रिभाषा सूत्रीचा सकारात्मक उल्लेख आल्याने वादाला तोंड फुटलं. या सूत्रामध्ये हिंदीचा उल्लेख केल्याबद्दल तामीळनाडूतून आक्षेप घेण्यात आला, त्यापाठोपाठ मनुष्यबळ विकास मंत्रालयाने तातडीने तो उल्लेख मागे घेतला आणि इंटरनेटवर प्रसिद्ध झालेल्या मसुद्यातील संबंधित परिच्छेदामध्ये बदल केला. नवीन पिढीतील वाचकांनी हा जुना शासकीय मुद्दा समजून घेणं गरजेचं आहे आणि त्रिभाषा सूत्रीमध्ये अजूनही धुगधुगी का आहे, हेही समजून घ्यायला हवं.

अनेक वेळा एखादा जुना दस्तावेज तुलनेने समकालीन आणि चर्चेला घेण्यात आलेल्या दस्तावेजापेक्षा अधिक ताजा वाटतो. सरकारला नवीन कार्यकाळ मिळाल्यावर आठवड्याभरात त्रिभाषा सूत्री सार्वजनिक चर्चेचा विषय ठरली. डी. एस. कोठारी यांच्या अध्यक्षतेखालील शिक्षण आयोगाने (१९६४–

६६) शैक्षणिक धोरणाचा मसुदा आखला, तेव्हा त्यात या सूत्रीचा पहिल्यांदा समावेश झाला. त्या आयोगाचे सदस्य-सचिव जे. पी. नाईक यांनी त्या विस्तृत अहवालाचा मसुदा तयार केला होता. विविध प्रदेशांमधील व एकूण मिळून भारतीय शिक्षण व्यवस्थेसमोरील समस्यांशी त्यांची सखोल ओळख होती. त्रिभाषा सूत्री केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने १९५६ साली तयार केली आणि काहीशा सुलभीकृत रूपामध्ये मुख्यमंत्र्यांच्या परिषदेने १९६१ साली तिला मंजुरी दिली, असं आयोगाच्या अहवालात म्हटलं आहे. यामागचे प्रेरक घटक शैक्षणिक असण्यापेक्षा राजकीय व सामाजिक होते, असं कोठारी आयोगाने नमूद केलं होतं.

कोठारी आयोगाच्या अहवालामध्ये भाषेसंबंधी एक तपशीलवार विभाग आहे. शैक्षणिक विचार आणि राजकीय दबाव यांमध्ये समतोल साधण्याची अहवालाची खटपट या विभागात दिसते. व्यवहारामध्ये त्रिभाषा सूत्रीची अंमलबजावणी करण्यात अनेक अडचणी आल्या आहेत आणि त्याला फारसं यश मिळालेलं नाही. या परिस्थितीसाठी अनेक घटक कारणीभूत आहेत. शालेय अभ्यासक्रमात भाषेचा जास्त ताण असण्याला सर्वसाधारणतः विरोध झाला, आणखी एक आधुनिक भारतीय भाषा शिकण्याबाबत हिंदी प्रदेशांमध्ये प्रेरणेचा अभाव दिसला, बिगरहिंदी प्रदेशांमध्ये हिंदी शिकण्याला विरोध झाला, आणि पाच ते सहा वर्षं (सहावीपासून ते दहावी वा अकरावीपर्यंत) दुसरी व तिसरी भाषा शिकवण्यासाठी खूप जास्त खर्च व प्रयत्न जात असल्याचं निदर्शनास आलं, अशा काही घटकांचा यात समावेश आहे... तिसऱ्या भाषेचा विचार करता अनेक प्रदेशांमधील विद्यार्थ्यांना फारशी ज्ञानप्राप्ती झालेली नाही, कारण त्यातील बहुतांश विद्यार्थ्यांनी या भाषेचा अभ्यास अवास्तव परिस्थितीमध्ये केला (पान ३३३, परिच्छेद ८.३२). विविध पर्याय आणि एका सदस्याचं मतभिन्नता दर्शवणारं टिपण यांची चर्चा केल्यानंतर कोठारी अहवालाने म्हटले होते की : प्राथमिक स्तरावर तीन भाषा शिकल्याने मुलाच्या मातृभाषेवरील प्रभुत्वाच्या विकासामध्ये मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप केला जाईल आणि त्याच्या बौद्धिक वृद्धीमध्येही अडथळा येईल... त्यामुळे नजीकच्या भविष्यात स्वतःची भाषा शिकण्यावर सर्वाधिक भर द्यायला हवा, आणि अधिकच्या भाषा शिकण्याचं प्रमाण कमीतकमी ठेवावं (पान ३४०, परिच्छेद ८.४१).

तिथून थेट एकविसाव्या शतकातील दुसऱ्या दशकाच्या शेवटाकडे येऊ. शिक्षण आयोगाच्या दृष्टिकोनातून पाहिलं, तर शिक्षणव्यवस्था आकलन होणार नाही इतकी बदलली आहे आणि कोठारी व नाईक यांना अंदाज बांधता आला नसता किंवा इष्ट वाटला नसता अशा प्रकारे हा बदल झाला आहे. सरकारी शाळांच्या बाबतीत झालेला पालकांचा प्रचंड भ्रमनिरास आणि आपल्या मुलामुलींना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्याची पालकांची उत्कटेच्छा यांमुळे खाजगी क्षेत्र फुगत जाणं, त्यात शिक्षकांचा आत्यंतिक तुटवडा जाणवणं आणि शिक्षकांच्या नियुक्तीमध्ये संस्थात्मक पातळीवर असुरक्षितता जोपासली जाणं, प्रचंड व्यापारीकरण झालेलं प्रशिक्षण मिळणारे शिक्षक- अशा पद्धतीच्या घटकांची व्यवस्थात्मक वाढ पाहून शिक्षण आयोगातील कोठारी, नाईक व त्यांचे सहकारी यांना धक्का बसला असता. शिक्षण व इतर क्षेत्रांमध्ये नियोजन किती अप्रस्तुत ठरलं आहे, हेही त्यांच्या लक्षात आलं असतं. त्यांच्या राज्यसंस्थाकेंद्रीय संदर्भचौकटीमध्ये राजकीय सत्ती स्वीकारली जात असे व त्यासंबंधी वाटाघाटी केल्या जात, पण बाजारपेठीय सत्ती फारच कमी होती. आता परिस्थिती उलटी झाली आहे. बाजारपेठीय दबाव मध्यवर्ती झाले आहेत, तर राजकीय सत्ती केवळ हावभावांपुरती मर्यादित उरली आहे, निरनिराळ्या माध्यमांतून सादर करण्यापुरतं या हावभावांना महत्त्व

आहे. हिंदीला प्रोत्साहन देण्याचा निर्णय आशयघन नसून केवळ पवित्रा घेणारा आहे. राष्ट्रवादाच्या प्रारंभिक प्रारूपावरील आपली श्रद्धा अढळ आहे, हे दाखवण्यापुरता नवीन मसुदा धोरणामध्ये त्रिभाषा सूत्रीचा उल्लेख करण्यात आला. अपेक्षित ठिकाणावरून याबद्दल आक्षेप घेण्यात आला. परंतु, हिंदी लादण्याचा आपला उद्देश नाही, असं सरकारने लगेच स्पष्ट केलं आणि या संदर्भात पूर्वी वाटाघाटींमधून समेट साधण्यात आला त्या स्थितीचीच पुनर्मांडणी करण्यात आली.

शिक्षण क्षेत्रातील भाषेशी निगडित प्रश्नांवर लागोपाठ झालेली शासकीय विधानं इंग्रजी माध्यमावर टीका करणारी होती. सुरुवातीच्या टप्प्यापासूनच इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाला लोक प्राधान्य देत आहेत, यावर या विधानांमधून टीका करण्यात आली. नवीन मसुदाही तेच करतो. 'शक्य असेल तेव्हा' मातृभाषा वा घरात बोलली जाणारी भाषा शिक्षणाचं माध्यम असावं, असं या मसुद्यात म्हटलं आहे. चुकलेल्या पण ठामपणे प्रस्थापित झालेल्या व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर ही समजूत सहिष्णू आहे आणि उघडपणे मांडल्या जाणाऱ्या भूमिकेहून अधिक सखोल जाणारी आहे. जुन्या व नव्या अभिजनांमध्ये हावभावांची देवाणघेवाण होण्यासाठीचा मंच, एवढंच शैक्षणिक धोरणासंदर्भातील संभाषिताचं काम उरलं आहे. हिंदीला एकेकाळी असलेला राष्ट्रवादी रंग आता उतरला आहे आणि राष्ट्रातील भावनिक ऐक्याची इतर साधनं अधिक प्रभावी ठरली आहेत. ●

---

## विनोदातून चिकित्सा करताना

*प्रत्येकाने सत्तेवर विनोद केला, तर सत्ताधारी सत्तेत राहातील का?*

पत्रकार प्रशांत कनोजिआ यांना अलीकडेच विनोद केल्याबद्दल अटक झाली. योगी आदित्यनाथ यांचं हसं होईल अशी नोंद समाजमाध्यमांवर प्रसिद्ध करणं, हा त्यांचा गुन्हा ठरला. कनोजिआ यांचं प्रकरण भारतीय जनता पक्षाची कार्यकर्ती प्रियांका शर्मा हिच्याशी मिळतीजुळतं आहे. ममता बॅनर्जी यांच्यासंबंधी हास्यास्पद 'मीम' शेअर केल्याबद्दल शर्मा यांना अटक करण्यात आली.

कनोजिआ यांना अटक झाल्यानंतर हा माध्यमस्वातंत्र्य जपण्याचा मुद्दा बनला, कारण त्याच दरम्यान ईशिका सिंग व अनुज शुक्ला या आणखी दोन पत्रकारांनाही अटक करण्यात आलं. कनोजिआ यांची कथितरित्या आक्षेपार्ह टिप्पणी असलेली एक चित्रफित प्रसारित केल्याबद्दल या दोघांना अटक झाली. याच प्रकरणामध्ये आणखीही तीन लोकांना अटक झाल्याचं कळलं. या अटकसत्राच्या घटनाविरोधी स्वरूपामुळे पत्रकार समुदाय रस्त्यावर आला आणि अटक झालेल्या पत्रकारांना ताबडतोब सोडण्याची मागणी करण्यात आली.

कनोजिआ यांच्याविरोधात खटला उभारण्यासाठी उत्तर प्रदेश पोलिसांनी स्वतः पुढाकार घेऊन वापरलेल्या कायद्यांमध्ये भारतीय दंडविधानातील कलम ५०० (फौजदारी अवमान) आणि माहिती व तंत्रज्ञान अधिनियमातील कलम ६६ या दोन कायदेशीर तरतुदी प्रमुख होत्या. सार्वजनिकरित्या खोडसाळ वर्तन केल्याचा कलम ५०५ खालील आरोप नंतर वाढवण्यात आला. सत्ताधाऱ्यांवर टीका करण्याचा अधिकार आता व्यक्तीला उरलेला नाही, हे लखनौ पोलिसांनी केलेल्या या बेकायदेशीर कारवाईवरून दिसून आलं. परंतु, वैयक्तिक स्वातंत्र्य कोणत्याही मार्गांनी धोक्यात आणले जाऊ नये, असे सांगत सर्वोच्च न्यायालयाने अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराची पाठराखण केली. त्यामुळे,

न्यायालयाच्या निर्णयानंतर कनोजिआ यांची मुक्तता झाली.

सत्ताधाऱ्यांचा उपहास केल्याबद्दल लोकांना शिक्षा सहन करावी लागल्याचा इतिहास दीर्घ आहे आणि कनोजिआ व शर्मा यांची प्रकरणं म्हणजे याच इतिहासातील ताज्या घटना आहेत. पूर्वी केवळ व्यंग्यचित्रकारांना व विनोदकारांना अशा प्रकारच्या कारवायांना सामोरं जावं लागत असे. पण आता, समाजमाध्यमांमुळे सत्ताधाऱ्यांचा उपहास करणारी कोणतीही गोष्ट शेअर करणं कारवाईसाठी पुरेसं कारण ठरू लागलं आहे. २०१६ साली कथितरित्या आक्षेपार्ह गोष्ट फेसबुकवर शेअर केल्याबद्दल भोपाळमधील एका किशोरवयीन मुलाला अटक करण्यात आलं. एखाद्या राजकीय नेत्याची निंदा करणारं गंमतीशीर व्यंग्यचित्र कोणा सर्वसामान्य नागरिकाने समाजमाध्यमांवर शेअर केलं, तर त्यातून स्वतःचं विचाराचं व अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य तो नागरिक वापरत असतो– मतभिन्नता नोंदवण्याचा एक मार्ग म्हणून नागरिक ही कृती करत असतात. या पार्श्वभूमीवर स्वतःचा उपहास झाला म्हणून सत्ताधाऱ्यांनी दडपशाहीचा प्रतिसाद देणं योग्य आहे का? स्वतःचा सत्तेवरील दावा वैध असल्याचं त्यांना वाटत असेल तर या वर्तनाचं समर्थन कसं करता येईल?

जगाच्या इतिहासात कायमच सत्ताधारी विनोदाने दुखावत आले आहेत. हॅन्स ख्रिश्चन अँडरसन यांनी 'द एम्परर्स न्यू क्लोथ्स'मध्ये दाखवून दिल्यानुसार, राजाकडे पाहून हसू नये, कारण तो हास्याहून उच्च स्थानावर असतो. सत्तेला हास्यास्पद बनण्यापासून संरक्षण प्राप्त करायचं असतं. विनोदातून आपल्या त्रुटी उघड होतील, या भीतीने सत्ताधारी विनोदाला विरोध करतात. कोण काय असल्याचं दाखवतं आणि प्रत्यक्षात काय असतं, यातील भेद विनोदामुळे उघड होतो. हे उघडेपण खुशामत करणारं नसतं आणि बलवानांना खाली आणण्याची क्षमता त्याच्यात असते.

हे खरं असलं तरी विनोद ही दुहेरी तलवार असते. बलवानांना खाली खेचण्यासाठी विनोदाचा वापर करता येतो, त्याचप्रमाणे वंचितांना निर्बल करण्यासाठीही त्याचा वापर केला जाऊ शकतो. ऐतिहासिकदृष्ट्या विनोद ही सत्ताधाऱ्यांची मक्तेदारी राहिली आहे. राजकीयदृष्ट्या निर्बल असलेल्यांविरोधातील विनोदाची इतक्यांदा पुनरावृत्ती केली जाते की, त्यातून घट्ट साचे निर्माण होतात आणि स्थितिशीलता कायम राहाते. नाझी जर्मनीमधील ज्यू लोकांचं चित्रण आणि त्यांची 'लांब नाकं' असोत किंवा 'स्त्रैण्य बंगाली' किंवा 'क्रूर गुरखे' हे वासाहतिक भारतातील चित्रण असो, त्यातून विनोदाचा विपरित वापर दिसून येतो. वंचितांची उरलीसुरली प्रतिष्ठाही काढून घेऊन त्यांना आणखी खचवण्यासाठी याचा दुरुपयोग केला जातो. लज्जा उत्पन्न करणं हा यामागील सामाजिक उद्देश असतो. उल्लंघनकारक मानल्या जाणाऱ्या वर्तनाला लज्जास्पद ठरवून आज्ञाधारकता लादण्यासाठीचं शक्तिशाली सांस्कृतिक साधन म्हणून विनोद वापरला जाणं शक्य आहे.

त्यामुळे विनोदाच्या राजकारणाची तपासणी करणं कायमच गरजेचं ठरतं. उघडपणे चिंताग्रस्त असलेली एक महिला आदित्यनाथ यांचं तिच्यावर प्रेम असल्याचा दावा करत होती, त्यासंबंधीचा व्हिडिओ शेअर करून कनोजिआ यांनी आदित्यनाथ यांच्याविषयी विनोदात्मक टिप्पणी केली. असा व्हिडिओ हास्य निर्माण करत असला, तरी त्याचा त्रास संबंधित महिलेला झाला. त्यामुळे कनोजिआ यांनी केलेला टीकेचा प्रयत्नही भेदभावजन्य व अनेक अर्थांनी अभिरुचीहीन होता, कारण या प्रकारामुळे संबंधित महिलेला आणखी वंचना सहन करावी लागली आणि तिच्या असुरक्षिततेमध्येही भर पडली. एका प्रकारच्या दडपशाहीचा वापर करून दुसऱ्या प्रकारच्या दडपशाहीबद्दल विनोद केला जाणार असेल, तर अशाप्रकारचा टीकात्मक विनोद अवैध ठरतो. एका स्त्रीच्या चिंताग्रस्ततेचा अपहार करून

स्वतःच्या राजकीय प्रकल्पाला पुढे रेटणं गैर असल्याची टीका कनोजिआ यांच्या टिप्पणीवरही करता येईल. त्यांना असं बोलण्याचा अधिकार आहे, पण विनोदाचा वापर संवेदनशीलतेने करण्याची जबाबदारी त्यांच्यावरही आहे.

तर, विनोदाची ताकद लक्षात आल्यामुळे लखनौ पोलिसांनी कनोजिआ यांच्या टिप्पणीवर अवाजवी कारवाई केली का? सद्यस्थितीत राजकीय संभाषितामध्ये टीकेला मर्यादित अवकाश आहे. मतभिन्नतेचा अवकाश रोडावत असताना सत्तेची दडपशाही पुनर्स्थापित होणं स्वाभाविक आहे. या समस्येला वळसा घालून आपलं म्हणणं मांडण्यासाठी अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या समर्थकांना डावपेच आखून विनोद वापरता यायला हवा. सत्तेला अभिप्रेत असलेल्या मौनाचा त्यातून भंग करता येईल. विनोदाच्या ताकदीविषयी स्टीव्हन पिंकर यांनी १९९७ साली एक निरीक्षण नोंदवलं होतं : सुटी हास्यं एकत्र येऊन हास्याचा मोठा स्फोट होतो तेव्हा ते आण्विक साखळी प्रतिक्रियेसारखं असतं. विनोदाचं लक्ष्य ठरलेल्या उच्चासनावरील व्यक्तीमधील सारख्याच दुबळेपणाचं दर्शन त्या सर्वांना झालेलं असतं. एकट्या कोणी असा अपमान केला तर विनोदाचं लक्ष्य ठरलेल्या व्यक्तीचा रोष त्याला सहन करावा लागतो, पण एकगठ्ठा गर्दी निःसंदिग्धपणे संबंधित लक्ष्यातील त्रुटींवर हसत असेल, तर ते सुरक्षित असतं.

विनोदातून उत्पन्न होणारं हास्य पुरेसं संसर्गजन्य असेल, तर कदाचित बलवान सत्ताधारी खाली कोसळतील का?

●

---

## सुरक्षेच्या मागणीपलीकडे जाण्याची गरज

*आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांच्याविरोधातील हिंसेवर तोडगा म्हणून सुरक्षिततेची मागणी करण्यापलीकडे डॉक्टरांनी जायला हवं.*

कोलकात्यातील एका रुग्णालयामध्ये मृत्यू पावलेल्या रुग्णाच्या नातेवाईकांनी दोन डॉक्टरांवर हल्ला केला, त्या नंतरच्या घडामोडींची निष्पत्ती गेल्या आठवड्यात डॉक्टरांच्या राष्ट्रव्यापी संपामध्ये झाली. रुग्णालयांमध्ये सुरक्षितता वाढवून मिळावी, अशी मागणी करत ‘नील रतन सरकार वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय’ इथले कनिष्ठ डॉक्टर संपावर गेल्याने या प्रकरणाची सुरुवात झाली. ममता बॅनर्जी सरकारच्या निष्क्रियतेमुळे (मुख्यमंत्री बॅनर्जी यांनी संपकऱ्यांना निर्वाणीचा इशारा दिला) शहरातील अनेक ज्येष्ठ डॉक्टरांनी राजीनामे दिले आणि देशभरात डॉक्टरांची निदर्शनं सुरू झाली. अखेरीस भारतीय वैद्यकीय संघटनेने (इंडियन मेडिकल असोसिएशन: आयएमए) १७ जून २०१९ रोजी राष्ट्रव्यापी संपाची हाक दिली. परिणामी, ओपीडी सेवेसह अत्यावश्यक नसलेल्या सर्व वैद्यकीय सेवांना या संपाचा फटका बसला व देशातील रुग्णांना निराधार ताटकळण्याव्यतिरिक्त पर्याय उरला नाही.

अगदी अलीकडेच, २०१७ साली महाराष्ट्रामध्ये अशाच प्रकारची परिस्थिती उद्भवल्याचं आपण पाहिलं होतं. डॉक्टरांवर हल्ले होण्याच्या काही घटना घडल्यानंतर महाराष्ट्र निवासी डॉक्टर संघटनेने पाच दिवसांचा संप केला. त्या वेळीही सुरक्षिततेमध्ये वाढ करण्याचीच मागणी संपकऱ्यांनी केली होती, आणि सरकारने या मागण्या मान्य केल्या होत्या. तेव्हापासून दोन वर्षं उलटली, तरी आपण काही धडे घेतल्याचं दिसत नाही. डॉक्टरांच्या मागण्या आणि सरकारकडून सुचवले जाणारे उपाय या दोन्हींमध्ये सुरक्षिततेच्या मुद्द्याभोवतीच घिरट्या घातल्या जातात. सुरक्षितता व सुरक्षेचे अधिक

उपाय योजावेत आणि कठोर कायदा करावा, या डॉक्टरांच्या मागण्या समर्थनीय आहेत, पण यातून केवळ तात्पुरती मलमपट्टी होईल.

तक्रार निवारण विभाग सुरू करावा आणि आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांविरोधातील हिंसेला प्रतिबंध करणारा केंद्रीय कायदा मंजूर करून घ्यावा, अशी मागणी कोलकात्यामधील संपकरी डॉक्टरांनी केली. आयएमएनेही केवळ केंद्रीय कायद्याची मागणी करून सुरक्षिततेच्या संभाषिताच्या मर्यादेतच युक्तिवाद केले आहेत. खरं तर, इतर अनेक राज्यांप्रमाणे पश्चिम बंगालमध्ये असा कायदा आधीपासूनच अस्तित्त्वात आहे. आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांविरोधातील हिंसाचार दंडनीय गुन्हा ठरवणाऱ्या या कायद्याची अंमलबजावणी सरकारने केलेली नाही, हे स्पष्ट आहे. डॉक्टर व इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांना सहन कराव्या लागणाऱ्या हिंसाचाराच्या घटना अधिकाधिक सर्रास होत आहेत, असं ताज्या अभ्यासांमधून निदर्शनास येतं. हे केवळ भारताच्या पातळीवरचं निरीक्षण नसून जागतिक पातळीवरही हाच कल दिसतो. हिंसाचाराचा सर्वाधिक फटका नर्सना बसतो, त्याचप्रमाणे इमर्जन्सी व इन्टेन्सिव्ह केअर (आयसीयू) या विभागांमध्ये काम करणाऱ्यांचा रुग्णांशी व त्यांच्या नातेवाईकांशी थेट संपर्क येतो, त्यामुळे त्यांनाही या हिंसेला जास्त सामोरं जावं लागतं. बहुतांश प्रकरणांमध्ये रुग्णालयात दीर्घ काळ ताटकळत बसल्याने रुग्णांमध्ये चिडचिड व हिंसेची वृत्ती निर्माण होत असल्याचं डॉक्टरांचं म्हणणं असल्याचं एका अभ्यासात नमूद केलं आहे. भारतातील एका विशेषसेवा रुग्णालयातील आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांचा अभ्यास २०१८ साली करण्यात आला, त्यात असं नमूद करण्यात आलं आहे की, कामाच्या ठिकाणी हिंसा होत असली, तरी कर्मचाऱ्यांकडून अशा घटनांविरोधात तक्रार केली जाण्याचं प्रमाण अतिशय कमी आहे, कारण तक्रार नोंदणी यंत्रणांबाबत रुग्णालयात अजिबात जागरूकता नव्हती. भारतीय आरोग्यसेवा व्यवस्थेतील खोलवर रुजलेल्या आजाराकडे निर्देश करणारं हे निरीक्षण आहे.

मृत्युमुखी पडलेल्या रुग्णाच्या संतप्त नातेवाईकांनी डॉक्टरांविरोधात केलेला हिंसाचार असो, वा डॉक्टरांच्या संपामुळे रुग्णांना सहन करावा लागलेला हिंसाचार असो, यातील हिंसेच्या कोणत्याही रूपाबाबत सहानुभूती बाळगणं योग्य नाही, पण कोणत्या परिस्थितीत अशी हिंसा घडते हे तपासावं लागेल. ही तपासणी समर्थनीय कारणं शोधण्यासाठी नव्हे, तर कारणांच्या स्पष्टीकरणासाठी आवश्यक आहे. भारताच्या आरोग्यसेवा व्यवस्थेला ग्रासून असलेल्या समस्या गुप्त राहिलेल्या नाहीत. संप सुरू असतानाच बिहारमधील मुझफ्फरपूर जिल्ह्यात तीव्र मेंदूज्वराची (ॲक्यूट एन्सेफलायटिस सिंड्रोम) गंभीर लागण झाल्याच्या बातम्या आल्या. या आजारामध्ये शंभरेक मुलांचा मृत्यू झाला असून ही संख्या वाढतेच आहे. या रोगाच्या भडक्यावरून सार्वजनिक आरोग्यसेवेची अकार्यक्षमता स्पष्ट होते. बिहारमध्ये हा रोग आधीपासूनच आढळत असतानाही ही अशी परिस्थिती आहे. उपलब्ध माहितीनुसार, मुझफ्फरपूर जिल्ह्यातील एकही सार्वजनिक आरोग्य केंद्र गुणवत्तेचे किमान निकष पूर्ण करणारं नाही. यातूनच हा आजार पुन्हा उद्भवला आहे, आणि त्याचा फटका आधीच तणावाखाली असलेल्या आरोग्यसेवेच्या पायाभूत रचनेला व संसाधनांना बसेल. रुग्ण अधिक त्रस्त व निराश होण्यासाठी पूरक परिस्थिती यातून निर्माण होते. तक्रार निवारण यंत्रणेच्या अनुपस्थितीत आणि परिस्थिती हाताळण्यासाठी पुरेशा मनुष्यबळाची वानवा, यांमुळे आरोग्यसेवा कर्मचारी व असहाय रुग्ण यांच्यातील संघर्षाचे प्रसंग वाढतात, त्यातून बोलाचालीचं रूपांतर हिंसेत होतं.

अपुऱ्या वैद्यकीय पायाभूत रचनांना व संसाधनांना हाताळणं, सार्वजनिक रुग्णालयांमध्ये कामाचा अतिरिक्त बोजा उचलणं, यांमुळे डॉक्टरांची कामाची ठिकाणं उच्चदाबाची बनली आहेत. त्याचसोबत आरोग्यसेवेकडे

व्यवसाय म्हणून पाहाण्याचा कल असलेल्या कॉर्पोरेट क्षेत्राचा वरचष्मा वाढल्यामुळे या व्यवस्थेचा गाभाच बदलून गेला आहे. आरोग्यसेवेमधील खाजगी क्षेत्राचं कामकाज नियमनाविना व देखरेखीविना सुरू आहे, त्यातून आरोग्यसेवेच्या किंमती वाढत गेल्या, वैद्यकीय निष्काळजीपणासंबंधीची निष्क्रियता वाढली, आणि अशा हिंसक घटनाही वाढल्या. या सर्व घडामोडींमुळे गेल्या काही वर्षांत डॉक्टर व रुग्ण यांच्या संबंधांमध्ये विश्वासाचा अभाव वाढत गेला. रुग्णांच्या दृष्टीने डॉक्टर हा दयावान त्राता राहिलेला नाही. आरोग्यसेवेतील 'सेवा' नावापुरती उरली आहे. गंभीर अवस्थेतील रुग्णांसोबतच त्यांच्या दुःखी नातेवाईकांना हाताळण्यासाठी आवश्यक संदेशनाची उचित कौशल्यंही डॉक्टरांकडे नसतात.

या संदर्भात, सर्व निदर्शनांमधून व संपांमधून डॉक्टरांनी केवळ सुरक्षिततताविषयक उपाययोजनांची मागणी करणं हे लघुदृष्टीचं निदर्शक आहे. व्यवस्थात्मक पातळीवर खरी समस्या उद्भवलेली आहे आणि त्याच पातळीवरून हे प्रश्न हाताळणं गरजेचं आहे. त्यासाठी मुळात सरकारने आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांच्या संरक्षणासाठीचा कायदा अंमलात आणण्यासाठी तजवीज करायला हवी. त्याचप्रमाणे वैद्यकीय आस्थापना अधिनियमाची अंमलबजावणी व्हायला हवी, विपुल मनुष्यबळ व इतर संसाधनांची तरतूद करायला हवी, आणि कायद्याने आखून दिलेल्या प्राथमिक नियमांचं पालन सर्व आरोग्यसेवा आस्थापनांमध्ये होत असल्याची खातरजमा करावी. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे डॉक्टर समुदायाने आतून बदल घडवण्याची गरज आहे, कारण हे व्यवस्थात्मक प्रश्न उपस्थित करून त्यासंबंधी तोडगा काढण्याची मागणी करणं त्यांनाच शक्य आहे. आरोग्यसेवा सक्रिय, कार्यक्षम व सुरक्षित राहावी, यासाठी हे करणं गरजेचं आहे. ●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाऊंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (दि. १५ व २२ जून २०१९ या अंकांतून. 'शुद्ध राजकारणाचं मोजमाप' आणि 'शिक्षण आणि सामायिक हिताची संकल्पना' ही दोन संपादकीये गोपाळ गुरू यांनी लिहिलेली आहेत.)

परिवर्तनाचा वाटसरू विक्री केंद्र

द्वारा अनुकार कम्युनिकेशन्स
अदिती अपार्टमेंट, १७३ ए - ३, महाराजा रेसिडेन्सी हॉटेल मागे,
पोवई नाका, सातारा ४१५ ००१
भ्र. ८८८८७०८९६३